# सपकाळ फार्मसी कॉलेज मध्ये जागतीक फार्मासिस्ट दिन उत्साहात साजरा

कल्याणी चॅरिटेबल ट्रस्ट संचलित रविंद्र गंभिरराव सपकाळ कॉलेज ऑफ फार्मसी, अंजनेरी, नाशिक येथे २५ सप्टेंबर २०१९ हा दिवस जागतीक फार्मासिस्ट दिन म्हणुन उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी महाविदयालयातील विदयार्थ्यांनी फार्मसी क्षेत्रातील विविध समस्या व संधी यांचे नाटयरूपात सादरीकरण केले.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन नाशिक येथील श्री. अशोक कुमार गुप्ता, Techincal Director, Blue Cross, Nashik हे उपस्थित होते. त्यांनी विदयार्थ्याना फार्मसी Safe and Effective Medicines For All हया जागतीक फामासिस्ट दिंनाचे घोष वाक्य व फार्मसी क्षेत्रातील विविध संधी व औषधांची सुरक्षितता व कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी औषधी कंपन्यांमध्ये आवश्यक असलेल्या नियमांच्या गरजेवर तसेच औषध घेण्यापुर्वी व घेतल्यानंतर रुग्णांनी कुठल्या प्रकारची काळजी घेतली पाहिजे याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जागतिक फार्मसिस्ट दिनाचे औचित्य साधुन पदविका व पदवी महाविद्यालयानी SIX SIGMA HOSPITAL, NASHIK, व PUSHKAR EYE HOSPITAL, NASHIK यांच्यामार्फत डोळ्यांची तपासणी व हेल्थ चेकअप घेण्यात आले. संस्थेचे मा. कल्याणी आर. सपकाळ, उप संचालक, यांनी विद्यार्थ्यांना औषधी वनस्पतींचे महत्व सांगितले. महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. आर. बी. सौदागर यांनी फार्मासिस्टच्या समाजाच्या प्रती असलेल्या महत्वाच्या भूमिका बाबत मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच या कार्यक्रमास श्री. अशोक कुमार गुप्ता, Techincal Director, Blue Cross, Nashik, मा. कल्याणी आर. सपकाळ, उप संचालक, सपकाळ नॉलेज हब, डॉ. बी. बी. रायते, कॅम्पस डायरेक्टर, सपकाळ नॉलेज हब, डॉ. आर. बी. सौदागर, प्राचार्य, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय डॉ. एस. बी. बागल, प्राचार्य, सपकाळ अभियंत्रिकी महाविद्यालय, डॉ. के. बी. हिरान, संचालक सपकाळ व्यवस्थापन महविद्यालय, प्रा. एस. बी. गोंदकर व इतर शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.



# सपकाळ फार्मसी कॉलेज च्या अश्विनी बोरणारे यांना दोन सुवर्ण

कल्याणी चॅरिटेबल ट्रस्ट संचलित रविंद्र गंभिरराव सपकाळ कॉलेज ऑफ फार्मसी, अंजनेरी, नाशिक या महाविद्यालयातील विद्यार्थीनी कु. अश्विनी संजय बोरनारे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे एम. फार्मसीच्या अंतिम वर्षांत झालेल्या परीक्षेमध्ये विद्यापीठात सर्वाधिक गुण संपादन करून प्रथम क्रमांक मिळवीला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ११६ वा पदवीप्रधान समारंभामध्ये त्यांनी मिळवलेल्या या घवघवीत यशाबद्दल विद्यापीठातर्फे त्यांना कै. डॉ. शिवराम गोपालकृष्ण भडबडे लक्ष्मीश्वर सुवर्णपदक आणि प्रा. डॉ. शिवाजीराव कदम सुवर्णपदक असे दोन सुवर्णपदक विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर याच्या हस्ते देऊन गौरव करण्यात आला. कु. अश्विनी बोरनारे यांना महाविद्यालयाचे स्वर्गीय प्राचार्य डॉ. आर. बी. सौदागर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा कार्यकारी संचालक डॉ. रविंद्र गंभिरराव सपकाळ उपाध्यक्षा सौ. कल्याणी सपकाळ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एस. बी. गोंदकर, प्रा. एस. एस. आहेर, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

